**प्रेस नोट दिनांक :- ३०/०७/२०२६**

## “ एमआयडीसी पोलीस ठाणेकडुन ईलेक्ट्रीक मोटार स्कुटर चोरी करणा-या दोन सराईत गुन्हेगारांना अटक करुन आरोपींनी मुंबई शहरातील वेगवेगळया ठिकाणावरुन चोरी केलेल्या एकुण ६,१८,०००/- रुपये किमतीच्या ११ ईलेक्ट्रीक मोटार स्कुटर हस्तगत करुन गुन्हे उघड कलेबाबत ”

दिनांक २०/०७/२०२६ रोजी दुपारी १२.०० वा ते सायंकाळी ०७.०० वाजेच्या दरम्यान डॉमिनोजच्या समोर, ओपस सेंटर, एमआयडीसी, अंधेरी पूर्व, मुंबई येथे पार्क केलेली फिर्यादी नामे श्री. वैभव सुनिल गुप्ता, वय २२ वर्षे, यांची जेमोपाय कंपनीची इलेक्ट्रीक मोटार स्कुटर कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी केली म्हणुन फिर्यादी यांनी अज्ञात इसमा विरुध्द तक्रार दिल्याने एमआयडीसी पोलीस ठाणे गु.र.क्र. ८५२/२६ कलम - ३०३(२),३(५) बी एन एस अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वर नमुद गुन्हयाच्या अनुषंगाने एमआयडीसी पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाने ५० ते ६० सीसीटीव्ही फुटेज तपासुन तसेच तांत्रीक तपास करुन गुप्त बातमीदार यांच्या मार्फतीने खालील आरोपी क्र. १ यास मोठया शिताफीने ताब्यात घेतले. तदनंतर आरोपी क्र. १ याच्याकडे केलेल्या चौकशीत आरोपी क्र. २ याचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास ताब्यात घेवुन नमुद गुन्हयात रितसर अटक करण्यात आली आहे.

**अटक आरोपीतांची नावे व पत्ता :-**

१) मोहसीन अकबरअली मालतबडे, मु. २५ वर्षे, धंदा - नाही, रा.ठि. रुम नं. २०४, कश्मीरी चाळ, क्रिपा मेडीकलच्या बाजुला, पंपहाऊस, जोगेश्वरी पुर्व, मुंबई.

२) अरफात हाफीज शेख, मु. २२ वर्षे, धंदा - नोकरी, रा.ठि. रुम नं. २७, बालाजी मंदीर, बाबु कसाई लेन, कपाडीया बिल्डींग, कुर्ला पश्चिम, मुंबई.

अटक आरोपीतांकडे केलेल्या सखोल चौकशीत त्यांनी मुंबई शहरातील मुंबई सेंट्रल, चांदीवली, चर्नीरोड, विक्रोळी, दादर, वाकोला, अंधेरी, वरळी अशा वेगवेगळया ठिकाणाहुन ईलेक्ट्रीक मोटार स्कुटर चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने सदरच्या ईलेक्ट्रीक मोटार स्कुटरबाबत अधिक तपास करुन त्या पंचनाम्याव्दारे ताब्यात घेवुन एकुण ६,१८,०००/- रुपये किंमतीच्या ११ ईलेक्ट्रीक मोटार स्कुटर जप्त करण्यात आल्या आहेत.

नमुद आरोपीतांनी चोरी केलेल्या एकुण ११ ईलेक्ट्रीक मोटार स्कुटरचा अभिलेख तपासुन पुढील कारवाई करीत आहोत. तसेच नमुद आरोपीतांकडुन चोरी केलेल्या आणखी ईलेक्ट्रीक मोटार स्कुटरबाबत त्यांचेकडे सखोल तपास करुन त्यांनी चोरी केलेल्या ईलेक्ट्रीक मोटार स्कुटर हस्तगत करत आहोत.

**उघडकीस आलेले गुन्हे पुढीलप्रमाणे**

**१) एमआयडीसी पोलीस ठाणे, मुंबई गु.र.क्र. ८५२/२०२६ कलम कलम - ३०३(२) बी एन एस**

**२) एमआयडीसी पोलीस ठाणे, मुंबई गु.र.क्र. ८५५/२०२६ कलम कलम - ३०३(२) बी एन एस**

तरी वर नमुद दोन आरोपीत इसमांना अटक करुन एमआयडीसी पोलीस ठाणे येथे दाखल ०२ गुन्हे उघडकीस आणुन नमुद गुन्हयांतील चोरीस गेलेल्या ०२ मोटार स्कुटर हस्तगत करण्याची तसेच मुंबई शहरातील विवीध ठिकाणावरुन चोरीस गेलेल्या ०९ ईलेक्ट्रीक मोटार स्कुटर अशा एकुण ११ ईलेक्ट्रीक मोटार स्कुटर हस्तगत करण्याची उल्लेखनीय कामगीरी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी पार पाडली आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती सो, मा. पोलीस सह आयुक्त (का व सु) डॉ. मनोजकुमार शर्मा सो, मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग डॉ. अभिनव देशमुख सो, मा. पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ ०३, मुंबई, श्री दत्ता नलावडे सो, व मा. सहा. पोलीस आयुक्त, अंधेरी विभाग, श्री. योगेश शिंदे सो,यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि श्री घनश्याम नायर, पो.नि गुन्हे श्री सुनिल करांडे यांचे प्रत्यक्ष देखरेखीखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोउपनि किरण पर्बत, पो.शि. जाधव, पो.शी. लोखंडे, पो. शि. अवघडे, पो.शि. कदम, पो.शि. पवार, पो.ह. विशाल पिसाळ(तांत्रिक मदत) यांनी पार पाडली आहे.